कार्यालय पोलीस स्टेशन गंगाखेड जि. परभणी

IO प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** गंगाखेड **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0065 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/02/2022 19:12 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 17/02/2022

**Date To ( दिनांक पर्यंत):** 17/02/2022

**Time From (वेळेपासून):** 13:22 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:49 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 23/02/2022 **Time (वेळ):** 18:57 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 038 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/02/2022 18:57 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 0.1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** संत ज्ञानेश्वर हॉटेल,गंगाखेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** बिबीषन एकनाथ मुरकुटे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गौमत नगर गंगाखेड, गंगाखेड,गंगाखेड,गंगाखेड,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गौमत नगर गंगाखेड, गंगाखेड,गंगाखेड,गंगाखेड,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-8888967272**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नवनाथ पांडुरंग लोखंडे | | | 1. सरगम कालनी,परभणी,परभणी, नानलपेठ,परभणी,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

पोलीस ठाणे गंगाखेड जि. परभणी दिनांक 23/02/2022 मी बिबीषन एकनाथ मुरकुटे वय 35 वर्ष व्यवसाय जेसीबी मालक/चालक रा.गौमत नगर गंगाखेड जि.परभणी मो.नं. 8888967272 फिर्याद देतो की,मी वरील ठिकाणचा राहणारा माझेकडे स्वतःची जेसीबी मशीन आहे व स्वतः मालक/चालक आहे. दि. 17/02/2022 रोजी मी ला.प्र.वि.कार्यालय परभणी येथील पोलीस उप अधिक्षक श्री.बिडवे साहेब यांना फोन केला व माझी तक्रार अस्तले बाबत त्यांनी सांगीतले तेंव्हा काही वेळाने पोलीस उप अधिक्षक श्री.बिडवे व सापळा पथक असे महातपुरी फाटा गंगाखेड येथे आले व नंतर मी तेथे गेलो व पंचासमक्ष समक्ष हजर राहुन तक्रार दिली की, मी वरील प्रमाणे राहणारा असून माझे स्वतःचे मालकीची एक जेसीबी माशीन ह्युडाई आर 80 अशी आहे. सदर मशीन मी स्वतः चालवतो. माझे राहते घराचे बाजुला शेती असून दि. 17/02/2022 रोजी सकाळी मी पावसामुळे बुजलेला नाला माझे जेसीबीने साफ करत होतो. त्यादरम्यान पोलीस ठाणे गंगाखेड येथील पोलीस कर्मचारी तेथे आले व मला म्हणाले की, तुझ्याकडे नाला साफ करण्याची परवानगी आहे काय? कशी काय नाली साफ करत आहेस? तहसीलदार यांची परवानगी काढली का? असे म्हणून मला अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली. त्यानंतर मी पोलीस कर्मचारी यांना सांगीतले की पावासाचे पाण्यामुळे माझे शेतीचे नुकसान होत असून मी माझे स्वतःचे पैशाने सदरचे नाली सफाईचे काम करीत आहे. यावर नमुद पोलीस कर्मचारी हे मला म्हणाले की, तुझ्याकडे नाला साफ करण्याची परवानगी नाही तुला तहसीलदार यांचेकडे चार ते पाच लाख रूपये दंड लागेल व आमच्याकडेच बाहेरच्याबाहेर मिटविले तर कमी खर्चामध्ये सोडुन देतो व मी पोलीस ठाण्यात देखील नेत नाही व काही कागदपत्रपण तयार करीत नाही असे मला नमुद पोलीस कर्मचारी यांनी सांगीतले. त्यावर मी त्यांना माझेकडे एवढे पैसे नसल्याचे त्यांनी सांगीतले. म्हणुन मग पोलीस कर्मचारी यांनी माझा मोठा भाउ कृष्णा मुरकुटे यास त्यांचे मोटार सायकलवर बसवून मला सांगीतले की, तुझी जेसीबीवर गुन्हा दाखल करायचा नसेल व तुझ्या भावास अटक करायची नसेल तर एक लाख रूपये घेवून पोलस स्टेशन समोरील हॉटेलमध्ये ये तुझ्या भावाला तेथेच बसवतो असे म्हणुन त्यातील एक पोलीस कर्मचारी माझे भावास घेवून निघुन गेला व दुसरा पोलीस कर्मचारी माझे जेसीबी जवळ थांबला. असे म्हणुन नमुद पोलीस कर्मचारी यांनी मला माझे जेसीबीवर गुन्हा दाखल करायचा नसेल व माझे भावास अटक न करण्यासाठी एक लाख रूपये लाचेची मागणी केली आहे. परंतु मी कुठलेही अवैध काम केले नाही व नमुद कामासाठी कुठल्याही प्रकारची पैसे देण्याची इच्छा नाही. मी नमुद पोलीस कर्मचारी यांना लाच दिली नाही तर ते माझे जेसीबी विरूध्द गुन्हा दाखल करून माझे भावास अटक करतील या भितीने मी त्यांना नाईलाजास्तव होकार देवून आपणकडे तक्रार दिली आहे. मी पोलीस ठाणे गंगाखेड येथील लोकसेवक पोलीस कर्मचारी यांना यांची दि. 17/02/2022 रोजी प्रत्यक्ष जावून भेट घेणार आहे. त्यांनी स्वतः अगर इतरांमार्फत लाच मागणी करून लाचेची रक्कम स्विकारल्यास त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी तक्रार दिली होती. त्यावरून पोलीस उप अधिक्षक श्री.बिडवे यांनी सोबत घेवुन आलेले दोन शासकीय पंच म्हणुन 1) श्री.शुभम मच्छींद्रनाथ हत्तीअंबीरे वरिष्ठ सहायक, 2)



Scanned with CamScanner

श्रीमती.प्रभावती आत्माराम ढेमरे कनिष्ठ सहायक, दोन्ही वित्त विभाग परभणी हे होते. दोन्ही पंचांची व माझी ओळख करून देण्यात आली. मी त्यांना माझी तक्रार तोंडी कथन केली. तसेच पोलीस उप अधिक्षक श्री.बिडवे यांनी माझी तक्रार मला लिहीता वाचता येत नसल्याने मी सांगीतल्याप्रमाणे लपटॉंपवर टंकलिखीत केली व प्रिंट काढुन पंचांना वाचण्यास दिली. दोन्ही पंचानी माझी तक्रार वाचून नंतर सदर तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर तात्काळ दि. 17/02/2022 रोजी मी व पंच क्र.1 असे गंगाखेड येथे पोलीस कर्मचारी यांची भेट घेतली असता नमुद लोकसेवक पोलीस कर्मचारी यांनी मला पंच क्र.1यांचे समक्ष माझे जेसीबीवर गुन्हा दाखल न करणेसाठी व त्यांचे भावास अटक न करण्यासाठी तडतोडीअंती 80,000/- रू लाचेची मागणी करून लाचेची रक्कम लगेच घेवून येण्यास सांगीतल्याचे निष्पन्न झाले होते. दि. 17/02/2022 रोजी पडताळणी दरम्यान मी लोकसेवक पोलीस कर्मचारी यांचे पंच क्र.1 यांचे समक्ष झालेले सदर संभाषण डिजिटल व्हाईस रेकॉर्डरच्या सहाय्याने नविन मेमरीकार्ड मध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहे. ते sandisk 8 GB Micro SDHC मेमरी कार्ड पोलीस उप अधिक्षक श्री.बिडवे यांनी ताब्यात घेतले आहे. तसा सविस्तर पडताळणी पंचनामा दि. 17/02/2022 रोजी करण्यात आला आहे. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री.बिडवे यांनी वाहनामध्ये सापळापुर्व व सापळा कार्यवाही दरम्यान मला पंचांना व सापळा पथकास प्रत्येकाच्या कामाबाबत सुचना दिल्या. तसेच अँथ्राँसीन पावडर व अल्ट्राव्हाईलेट लंम्पचे गुणधर्म व वापरा बाबत माहिती दिली. त्याबाबत पोशी/धबडगे यांचेकडून प्रात्यक्षीक करून दाखविण्यात आले. पोशि/धबडगे यांनी लाचेची रक्कम 80,000/- रू (ज्यामध्ये 500/- रू दराच्या 160 चलनी नोटांना) अँथ्राँसीन पावडर लावून माझे अंगावरील पन्टचे डाव्या बाजूचे खिशात व्यवस्थीत ठेवून दिली. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे आम्ही नमुद पोलीस कर्मचरी यांना लाचेची रक्कम देण्यासाठी निघालो. आमचे पाठोपाठ सापळा पथक रवाना झाले. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे वाहनापासुन निघून माझे मोटार सायकलवर नमुद पोलीस कर्मचरी यांना लाचेची रक्कम देण्यासाठी पोलीस स्टेशन गंगाखेडचे समोरील हॉटेल मध्ये गेलो.तेथे थोडयावेळाने नमुद पोलीस कर्मचारी पैकी एकजन आले व त्यांनी माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारली नाही. दरम्यान त्यांना फोन आला व ते थोडयावेळाने येतो म्हणून निघुन गेले. बराच वेळ झाल्याने मी नमुद पोलीस कर्मचारी यांना फोन केला असता. त्यांनी मला उद्या येण्यास सांगीतले. अशाप्रकारे त्यांनी माझेकडून लाच स्विकारली नाही. मी व लोकसेवक पोलीस कर्मचारी यांचेमध्ये पंच क्र.1 समक्ष झालेले संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डद्वारे ध्वनिमुद्रीत करण्यात आले ते sandisk 8 GB Micro SDHC ध्वनिमुद्रीत संभाषण असलेले नविन मेमरी कार्ड ताब्यात घेण्यात आले आहे. सदर बाबतचा सविस्तर सापळा स्थगीती पंचनामा करण्यात आलेला आहे.त्यानंतर मी नमुद पोलीस कर्मचारी यांना फोन केले परंतू त्यांनी फोन उचलले नाहीत व मला लाचेच्या रक्कमेची आज पावेतो कसल्याही प्रकारे मागणी केलेली नाही. त्यामुळे नमुद पोलीस कर्मचारी यांना आता माझा संशय आला असून ते यापुढे माझ्याकडुन पैसे स्विकारणार नाहीत. तसेच लाचेच्या पैशासाठी संपर्क करणार नाहीत असे मला वाटते तसा आज दि. 23/02/2022 रोजी मी पोलीस उप अधिक्षक श्री.बिडवे यांना अ.ॅ.सी.बी.कार्यालय परभणी येथे जावून समक्ष सविस्तर जबाब दिला आहे. तरी मी दि.17/02/2022 रोजी दिलेल्या तक्रारीवरून दि.17/02/2022 रोजी 13.22 ते 13.49 वाजताचे दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान नवनाथ पांडुरंग लोखंडे, वय 35 वर्ष व्यवासाय नोकरी पोलीस नाईक ब.नं.1240 ने.पोलीस ठाणे गंगाखेड (वर्ग-3), यांनी संत ज्ञानेश्वर हॉटेल,पोलीस ठाणे गंगाखेड चे समोर गंगाखेड येथे मला माझे जेसीबीवर गुन्हा दाखल न करणेसाठी व माझे भावास अटक न करण्यासाठी तडतोडीअंती 80,000/- रू लाचेची मागणी केली व नमुद लाचेची रक्कम लगेच घेवून येण्यास सांगीतल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यावरून नवनाथ पांडुरंग लोखंडे, वय 35 वर्ष व्यवासाय नोकरी पोलीस नाईक ब.नं.1240 ने.पोलीस ठाणे गंगाखेड (वर्ग-3) यांचे विरूध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी म्हणून ही फिर्याद देत आहे. माझी फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली आहे. सदर फिर्याद मला वाचून दाखवली ती मला समजली असता माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Vasundhara Vittalrao Borgaonkar(I (Inspector)) / **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**



Scanned with CamScanner

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन, गंगाखेड

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

Name (नाव): Vasundhara Vittalrao Borgaor
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.):

Scanned with CamScanner